**Peer Reviewed International Research Journal of Geography**
**Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika**
ISSN : 0971-6785 {Impact Factor 3.687 (IIFS)} Vol. 36, No.2, Jul-Dec. 2019. pp 53-60

## ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतातील जलनिती एक अभ्यास''

## (A Study of Dr. Babasaheb Ambedkar's Water Policy in India)

Dr. Landge S.S.

***Abstract***

*(Abstract)*

*Surface water in the form of rivers, streams and lakes is the most important source, which can be utilized for irrigation, navigation and generation of hydro-electricity purposes. In Indian scenerio surface water that quickly runs off land also causes erosion and flooding problems. Dr. Babasaheb Ambedkar knows the importance of surface water resources; evantually he worked lot in this regard.*

*Present work owes to study the water policy in India formulated by Dr.B.R. Ambedkar and also to assess the water policy in the present contexts of India, propounded by Babasaheb Ambedkar. The study is based on secondary sources of information which are in the forms of Ambedkar's writings, speeches, books, commission reports, government meetings, views put forwarded in the seminars and various conferences by Dr. Babasaheb Ambedkar. This study is delimited only the water policy in India propounds by Dr. B.R. Ambedkar. In this manner whole work of Babasaheb Ambedkar is mostly found during 1940-1950 decade. Being a political leader and economist he actively participated in various authorities and government bodies. Subsequently contribution of Dr B.R. Ambedkar is notable in this regard. Lastly the study is concluded that, Rivers Inter-Linking projects in India propounded by Dr. Ambedkar is useful to check the flood hazards and also it will be benefited to upliftment of Indian farmers through irrigation projects. Dr. B.R. Ambedkar also advised that the flood hazards are nothing but it will become the source of sustainable development, when flood controls through constructing river dams and proper management of it. To maintain the National Unity, Social Justice and equal rights among the Indian citizens, he advised that Rivers and multipurpose projects authority should be under Central Government. Contribution of Dr.B.R. Ambedkar is Vital in the formation of central water commission, Irrigation and Navigation Commission, Central waterways and Multipurpose Valley Development projects (MVDP) in India.*

**Keywords -** *River Inter-linking Projects, Multipurpose River Projects, River basin development project, water management and its conservation.*

**१. प्रस्तावना** (Introduction)

**भारतातील भूपृष्ठ रचनेचा परिणाम पर्जन्याचे वितरण आणि भूपृष्ठजलाच्या** (Under Ground Water) **उपलब्धतेवर झालेला आहे. शाश्वत विकास प्रक्रियेत पाण्याला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे प्रादेशिकवाद व पाणी प्रश्न निर्माण होत आहेत. भारत कृषी प्रधान देश असून सद्य स्थितीत शेतीच्या समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या, बेरोजगारी, अल्पभूधारणा, अपूरे जलसिंचन, महापूर व पाणी टंचाई या समस्यांच्या संदर्भात जलसंसाधनाचा वापर हा बहुउद्देशिय स्वरुपाचा होणे आवश्यक आहे. भारतातील जलसंसाधना संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते.**

**२. उद्दिष्ट्ये** (Objectives)

i) **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जलनिती पाहणे.**

ii) **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जल नितीचे सद्यस्थितीतील महत्त्व तपासणे.**

**३. संशोधन पद्धती** (Research Methodology)

**प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्वरुपाची माहिती** (Secondary Data) **वापरली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. येथे अभ्यासाची मर्यादा जलविषयक विचारांपूरतीच सिमीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक कार्य साधारणत: १९४२ ते १९५० दरम्यानचे आहे. त्यांचे जलविषयक विचार एकाच विशिष्ट ठिकाणी व सूत्रबद्ध स्वरुपात नसून ते ग्रंथ, भाषणे, वर्तमानपत्रातील विविध लेख, परिसंवाद, चर्चासत्रे आणि शासकीय विधेयके या स्वरुपात उपलब्ध आहेत.**

**४. अभ्यास स्त्रोत** (Study Source)

**अ. कौटुंबिक जीवन** (Family Life): **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुटूंब कोकणातील 'आंबडवे' गावचे मूळ रहिवासी. बाबासाहेबांच्या वडीलांचे नाव रामजी मालोजी सकपाळ, आईचे नाव भीमाबाई तर सावत्र आईचे नाव जिजाबाई होते आणि आत्याचे नाव मिराबाई होते. रामजी व भीमाबाई यांच्या १४ अपत्यांपैकी ३ मुले व ४ मुली वगळता बाकी सर्वांचे बालपणी निधन झाले. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशात इंदौर जिल्ह्यातील महू गावी झाला. बाबासाहेबांचे बालपण आत्या मिराबाईंच्या सहवासात व मायेत गेल्याने आत्यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण ०६ डिसेंबर १९५६ या दिवशी दिल्ली येथे झाले तर अत्यंसंस्कार मुंबई या ठिकाणी झाला. या स्थळालाच चैत्यभूमी असे म्हणतात. बाबासाहेबांच्या प्रथम पत्नीचे नाव रमाबाई तर द्वितीय पत्नीचे नाव सविता होते. बाबासाहेबांना पाच अपत्य होते. यापैकी रमेश, राजरत्न, गंगाधर ही तीन मुले तर इंदू ही मुलगी यांचे बालपणीच निधन झाले. यशवंत हे बाबासाहेबांचा मुलगा व मिराबाई या सून होत्या. प्रकाश, भिमराव व आनंदराव हे बाबासाहेबांचे तीन नातू आहेत.**

**ब. आर्थिक परिस्थिती** (Economic Condition) **: रामजी आंबेडकर हे ब्रिटिश भारतीय सैन्यात सुभेदार होते. त्यांच्या तुटपुंज्या पगारावर कुटुंबाचा आर्थिक भार सांभाळणे अत्यंत जिकीरीचे होते. रामजी आंबेडकरांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भिमरावांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी अपार कष्ट केले. २ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजी आंबेडकर यांचे निधन झाले. यांच्या निधनानंतर बाबसाहेबांचे पुढील शिक्षण घेणे आर्थिकदृष्ट्या अशक्य झाले. त्यामुळे त्यांनी तत्कालीन बडोदा संस्थानचे महाराजे सयाजीराव गायकवाड यांच्याकडे उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्तीसाठी व आर्थिक मदतीसाठी अर्ज केला. त्यांच्या विनंतीला अनुकूल प्रतिसाद देवून बाबासाहेबांना बडोदा संस्थानाचे महाराजे सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली.**

**क. शिक्षण** (Education) **: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बी.ए. (डिसेंबर १९१२–मुंबई विद्यापीठ), एम.ए.अर्थशास्त्र (जून १९१५–कोलंबिया विद्यापीठ, अमेरिका), पीएच.डी. (जून १९१७–कोलंबिया विद्यापीठ, अमेरिका), बॅरिस्टर (जून १९२२ ग्रेज–इन संस्था, लंडन), डॉक्टर ऑफ सायन्स (नोव्हेंबर १९२३–लंडन विद्यापीठ, इंग्लंड) ८ जुलै १९४५– पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना मुंबई येथे केली. २० जून १९४६– मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना, ६ जून १९५०– औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली.**

**ड. लेखन कार्य** (Writings) **: डॉ. बी. आर. आंबेडकरांचे बहुआयामी व्यक्तीमत्त्व होते. त्यामुळे त्यांनी विविध विषयांवर आपल्या लेखणीद्वारे प्रकाश टाकला. डॉ. आंबेडकरांनी थॉट्स ऑन पाकिस्तान (१९४०), कॉंग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रति काय केले (१९४५), शुद्र पूर्वी कोण होते (१९४६), दि अनटचेबल्स् (१९४८), बुद्ध आणि त्यांचा धम्म (१९५०) या महत्त्वपूर्ण ग्रंथसंपदा शिवाय अनेक महत्त्वाचे लेखन कार्ये केले.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थतज्ज्ञ होते. कोलंबिया विद्यापीठाला १९१५ साली ''ऍड़मिनिस्ट्रेशन ऍण्ड फायनान्स् ऑम ईस्ट इंडिया कंपनी'' या विषयी प्रबंध सादर केला तर १९१७ साली ''द इव्होल्यूशन ऑम प्रोविन्शियल फायनान्स् इन ब्रिटिश इंडिया : अ स्टडी इन द प्रोविन्शियल डिसेंट्रलायझेशन ऑम इंपिरियल फायनान्स'' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. ''लंडन स्कूल ऑम इकॉनॉमिक्स'' या संस्थेला १९२३ साली ''द प्रॉब्लेम ऑफ द रुपी, इट्स ओरिजिन ऍ़ण्ड इट्स सोल्यूशन'' या विषयी प्रबंध सादर केला.

इ. **सामाजिक योगदान** (Social Contribution)**: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील जातीयवाद, अस्पृश्यता व सामाजिक विषमता याबद्दल चीड होती. त्यातूनच त्यांनी सामाजिक एकोप्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. २१ व २२ मार्च १९२० माणगाव परिषद, २० मार्च १९२७ महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह, १५ फेब्रुवारी १९२९ अमरावती येथे आंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह, १३ ऑक्टों. १९२९ पुणे येथे पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह, ३ मार्च १९३० नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, ९ ऑगस्ट १९३० नागपूर येथे पहिली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद, २६ डिसेंबर १९३७ खेड (रत्नागिरी) येथे चर्मकार परिषद, ३० डिसें. १९३७ पंढरपूर येथे अस्पृश्य वर्गाची परिषद, डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक कार्याची सुरुवात जाती अंताच्या लढ्यापासून झाली. समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्व, न्याय, स्वाभिमान या मानवी मूल्यांधिष्ठीत एक नवीन विषमताहीन समाजरचना निर्माण करण्यासाठी धडपड केली.**

म . **राजकीय योगदान** (Political Contribution) **: डॉ. आंबेडकरांनी १३ ऑगस्ट १९२१ या दिवशी सक्तीचे मोफत शिक्षण घेण्याबाबत मध्यप्रांत कौन्सिल मध्ये ठराव पास करुन घेतला. १९ मार्च १९२८ रोजी मुंबई कायदे कौन्सिलमध्ये महार वतनासंबंधी विधेयक मांडले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर १४ नोव्हेंबर १९३० मध्ये लंडन येथे झालेल्या पहिल्या गोलमेज परिषदेस उपस्थित राहिले. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी भारतातील अस्पृश्यांच्या परिस्थितीबद्दल विचार मांडले. त्यांनी अस्पृश्यांच्या मुलभूत हक्कांचा एक जाहीरनामा तयार केला आणि समितीसमोर सादर केला. अस्पृश्य वर्गांची स्वतंत्र्य राजकीय ओळख प्रस्थापित करण्यासाठी बाबासाहेबांनी १५ ऑगस्ट १९३६ या दिवशी 'स्वतंत्र्य मजूर पक्ष' स्थापन केला. सन १९४० मध्ये विधानसभेत (महाराष्ट्र राज्य) महार वतन बिल मांडले. ०२ जुलै १९४२ रोजी व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिलमध्ये मंत्रिमंडळात समावेश केला गेला. १९ जुलै १९४२ या दिवशी 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन' ची स्थापना केली. २० जुलै १९४२ रोजी 'मजूर मंत्री' पदाचा कार्यभार स्विकारला. सन १९४७ मध्ये भारताचे पहिले 'कायदा मंत्री' म्हणून शपथ घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ०२ वर्ष ११ महिने १८ दिवसांत संविधान लिहून २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी संविधान सभेस सुपूर्द केले. भारतीय संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आणले गेले. ३० सप्टेंबर १९५६ रोजी 'रिपब्लिकन पक्ष' स्थापनेचा निर्णय घेण्यात आला.**

**५. संशोधन विषय** (Research Problem) **:–**

**भारतात २० नद्यांची मोठे खोरे आहेत. यापैकी महाराष्ट्रात ०५ मोठे नदी खोरे आहेत. नदी खोरे नैसर्गिक असते. त्यामुळे नदीखोरे हे एकात्मिक विकासाचे एकक गृहीत धरावे व त्याआधारेच विकासाच्या योजना आखल्या पाहिजेत. यासाठी राज्या राज्यांचे सहकार्य असणे आवश्यक आहे. नदीतील पाण्याला जिल्हा, विभाग, राज्य व देश यांच्या सीमा नसतात असे डॉ.आंबेडकरांनी प्रतिपादन केले.**

**महापूर हे संकट अशी धारणा त्याकाळी जगभर प्रचलित होती. भारतातील नद्यांना येणाऱ्या महापूरामुळे जीवितहानी, वित्तहानी, पर्यावरणहानी, रोगराईचे थैमान व पाण्याचे दुर्भिक्ष्य अशी लवकर नियंत्रणात न**

**येण्यासारखी परिस्थिती निर्माण होत असे. अशा परिस्थितीचा सखोल अभ्यास करुन डॉ. आंबेडकरांनी असे विचार मांडले की, अतिरिक्त पाणी हे संकट नसून योग्य नियोजन, व्यवस्थापन आणि नियंत्रण केल्यास ते संसाधन ठरु शकेल. महापूर प्रतिबंधक स्वरुपाचे न राहता ते बहुउद्देशिय असावे. असा विचार करणे चूकीचे आहे की, पाणी जास्त आहे आणि पावसाळ्यात समुद्राकडे वाहत जाऊ द्यावे. डॉ.आंबेडकरांच्या मते पाण्याचे जनतेच्या उपयोगाकरीता साठवण करणे आवश्यक असून त्यासाठी बहुउद्देशिय योजना आखणे गरजेचे आहे. निसर्ग पावसाच्या स्वरुपात अतिरिक्त किंवा निम्न स्वरुपात पाणी देतो. परंतु एकमात्र सत्य आहे की पाणी हे संसाधन आहे. त्यामुळे देश हितासाठी पाण्याचे व्यवस्थापन व संधारण** (Conservation) **करणे गरजेचे आहे.**

i. **व्हाईसरॉय मंत्रिमंडळ : २० जूलै १९४२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्हाईसरॉय मंत्रिमंडळात मजूर मंत्रीपदाचा** (Labour Ministry) **पदभार स्विकारला. १९४२ ते १९४६ या कालावधीत मजूर मंत्री होते. त्यांच्याकडे कामगार** (Public Works)**, ऊर्जा** (Electric Power)**, सिंचन** (Irrigation) **व खाणकाम** (Mining) **या खात्यांचा पदभार होता. याच काळात डॉ.आंबेडकरांनी बहुउद्देशीय प्रकल्पाची** (Multipurpose Projects) **मुहूर्तमेढ रोवली. बहुउद्देशीय नदीखोरे विकास प्रकल्प, रेल्वे आणि जलमार्ग आयोग, विद्युत प्राधिकरण निर्मिती, केंद्रीय जल आयोग, सिंचन व जलवाहतूक आयोग, दामोदर खोरे योजना, हिराकूड प्रकल्प निर्मिती, सोन परियोजना या संदर्भात डॉ.आंबेडकरांचे महत्त्वाचे योगदान आहे.**

ii. **राष्ट्रीय जलनितीची कल्पना** (Views about National Water Policy)- **भारतातील भूपृष्ठजलाचा सदुपयोग करुन घेण्यासाठी सूचविलेल्या अनेक उपाय व योजनांना साकार रुप देण्याच्या धोरणास डॉ. बाबासाहेबांची जलनीति म्हणता येईल.**

**अ. केंद्रीय जलमार्ग, सिंचन व जलवाहतूक आयोग** (Central Waterways, Irrigation and Navigation Commission) **:– सन १९४० च्या दशकात भारतात आर्थिक धोरण निश्चित होत होते. सन १९४२ ते १९४६ या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या विकाससंबंधी फार महत्त्वपूर्ण योगदान होते. सिंचन व औद्योगिक विकास साधण्यासाठी एक धोरणात्मक आराखडा तयार केला गेला. सन १९३५ च्या कायद्यानुसार सिंचन व ऊर्जा हे राज्यशासनाच्या अंतर्गत होते. परंतु डॉ.आंबेडकर केंद्रशासनाच्या माध्यमातून संपूर्ण देशामध्ये जलसंसाधन धोरण लागू करु इच्छित होते. यामुळे पाणी हा विषय केंद्रशासनाच्या अधिनस्त झाला. देशातील जलसंपत्ती विकास आणि समस्या यांचा अभ्यास करणे यासाठी कार्यक्षम, जाणकार, तज्ज्ञ व नोकर मंडळीचा समावेश व्हावा म्हणून ५ एप्रिल १९४५ रोजी केंद्रीय जलमार्ग, सिंचन व जलवाहतूक आयोग** (Central Waterways, Irrigation and Navigation Commission) **स्थापन करण्यात आला. या आयोगाचे अध्यक्ष डॉ.ए.एन. खोसला होते. या आयोगामार्फत सर्वेक्षण करणे, सांख्यिकी संकलन करणे व योजना तयार करण्याचे निश्चित झाले. यामुळे संपूर्ण देशात जलसंधारण, नियोजन, समन्वय व अंमलबजावणी यास गती मिळाली. सध्या या आयोगाला केंद्रीय जल आयोग** (Central Water Commission) **म्हणतात.**

**नदीखोरे विकास हे खाते केंद्रशासनाच्या अधिकारात आणण्यात आले. परंतु राज्यशासन, प्रांत सरकार व केंद्रशासन यांनी संयुक्तरित्या व समन्वयाने नदीखोरे विकास करणे यास प्राधान्य देण्यात आले. यामुळे क्षेत्रीय विकास साधण्यासाठी जलसंसाधनाचा बहुउपयोगास चालना मिळाली. दामोदर नदी, महानदी, सोन नदी हे महत्त्वपूर्ण बहुउद्देशीय प्रकल्प याचेच फलित मानले जातात.**

**ब. नदीजोड प्रकल्प** (River Inter-Linking Project) **: भारताच्या एकूण जलक्षेत्रापैकी सुमारे ३३% क्षेत्र**

**व्यापणाऱ्या गंगा, ब्रम्हपुत्रा व मेघना या नद्यांच्या खोऱ्यात भारतातील एकूण जलसंपदेपैकी ६६% जलसंपदा आहे. या नद्यांच्या परिक्षेत्रातील जनतेस नेहमी महापूर व त्यापासून उद्भवणाऱ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या गंभीर बाबींकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लक्ष केंद्रीत करुन नदीजोड प्रकल्पाची सर्वप्रथम मांडणी केली.**

**डॉ. आंबेडकरांचे असे मत होते की, शाप ठरलेल्या बारमाही नद्यांना वरदान बनविण्यासाठी हंगामी नद्यांशी जोडणी केल्यास पाणी टंचाई व दुष्काळाची तीव्रता कमी करण्यात मदत होऊ शकेल. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या दक्षिणेतील नद्यांना जोडणे तसेच कृष्णा, कोयना, गोदावरी व तापी या नद्यांतील पाणी वाया जाऊ नये म्हणून नद्याजोड प्रकल्प राबविण्याची व नद्यांवर बहुउद्देशीय प्रकल्प उभारण्याचे विचार मांडले.**

**क. संवैधानिक तरतुद** (Legal Provisions) **: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत २४२ व २६९ या क्रमांकाची कलमे जलव्यवस्थापनासंबंधी प्रस्तुत केली आहेत. शेतकऱ्यांना व शेतीला पाणी मिळावे यासाठी डॉ.आंबेडकरांनी जलनिती आखली.**

**ड. बहुउद्देशीय नदी खोरे विकास प्रकल्प** (Multipurpose Valley Development Project) **: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जल व ऊर्जा या विषयी बहुउद्देशीय संकल्पना मांडली. शेतकरी सुखी व समृद्ध झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. यामुळे सन १९४२ ते १९४६ या कालावधीत नदी प्रकल्पासंबंधी धोरणे तयार करण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांनी पार पाडली. या कालावधीत नव्या जल व विद्युत धोरणाची पायाभरणी केली. डॉ. आंबेडकरांनी १५ नोव्हें. १९४३ ते ०८ नोव्हें. १९४५ या कालावधीत पाच चर्चासत्रात जलव्यवस्थापन, जलनियोजन व संवर्धन या संबंधी मार्गदर्शन केले. बहुउद्देशीय नदीखोरे विकास प्रकल्प** (Multipurpose Valley Development Project) **ही महत्त्वाची योजना कार्यान्वित केली.**

**बहुउद्देशीय योजना डॉ. आंबेडकरांनी मांडली. बहुउद्देशीय प्रकल्प म्हणजे नदीखोऱ्यातील उपलब्ध संसाधनाचा आंतरसंबंध लक्षात घेऊन नदी खोऱ्याचा सर्वांगिण विकास करणे. नदीखोऱ्यात पाण्याची उपलब्धता आणि विविध क्षेत्रातील वापर या दोन्हींची सांगड घालण्यासाठी नदीखोरे विकासाची आवश्यकता लक्षात घेऊन दामोदर नदीखोरे प्रकल्प, महानदी खोरे बहुउद्देशीय योजना आणि सोन नदी प्रकल्प आखले गेले. नदीखोरे प्राधिकरण स्थापन केले. याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच जाते.**

**ळ. दामोदर खोरे योजना** (Damodar Valley Project) **: दामोदर नदी छोटा नागपूर पठारावर उगम पावते. या नदीची एकूण लांबी ५४९ कि.मी. असून पाणलोट क्षेत्र २२००० चौ.कि.मी. आहे. ही नदी कोलकात्त्याच्या दक्षिणेस ४८ कि.मी. अंतरावर गंगा नदीला मिळते. बिहार, पश्चिम बंगाल, व सध्याच्या झारखंड राज्यातून वाहणाऱ्या दामोदर नदीला महापूर येत असे. त्यामुळे पूर्वी या नदीला 'बंगालचे अश्रू' असे म्हणत. दामोदर नदी भारताची राष्ट्रीय समस्या झाली होती. महापूर, दुष्काळ, अन्नधान्य टंचाई सारखे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. १७ जूलै १९४३ रोजी दामोदर नदीला आलेल्या महापूरामुळे फार मोठे संकट निर्माण झाले. सुमारे सत्तर गावांना या महापूराची झळ बसली. जीवित व वित्त हानी मोठ्या प्रमाणात झाली. दामोदर नदीला येणाऱ्या महापूराचा बाबासाहेबांनी सखोल अभ्यास केला व दामोदर नदी खोरे प्रकल्पाची रुपरेखा तयार केली. हा प्रकल्प अमेरिकेतील 'टेनिसी व्हॅली ऍथॉरिटी प्रोजेक्ट' च्या धरतीवर आखला आहे. महापूरामुळे होणाऱ्या विध्वंसावर मात करुन एकूण हित कसे साधता येईल या संबंधीचे विचार बाबासाहेबांनी मांडले. नदी पात्रात सुरुंग लावणे, नदी पात्र खोल व रुंद करणे, पूराच्या पाण्याचा साठा करणे व हरितक्रांती करणे असे महत्त्वाचे विचार त्यांनी मांडले.**

**३ जाने. १९४४ रोजी कोलकात्ता येथे 'दामोदर प्रकल्प चर्चा परिषद' घेण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी असे विचार मांडले की, दामोदर नदीखोरे प्रकल्प बहुउद्देशीय असून हा प्रकल्प निर्मितीचा उद्देश हा केवळ महापूर नियंत्रण एवढाच नसून त्यामध्ये जलविद्युत निर्मिती, जलसिंचन, जलवाहतूक करणे, ग्रामीण, नागरी व औद्योगिक विकासासाठी पाण्याची उपलब्धता व वापर यांचा समावेश असल्याचे स्पष्ट केले. तसेच कालवा सिंचनाबरोबरच कुपनलिकेच्या सहाय्याने पाण्याचा उपसा करुन पाण्याची उपयोगिता वाढविणे, दलदलीच्या भागातील पाणी काढून जमिनीचा वापर व उत्पादन क्षमता वाढविणे या सर्व बाबींचा खुलासा केला. २३ ऑगस्ट १९४४ रोजी कोलकात्ता येथे डॉ. आंबेडकरांनी असे विचार मांडले की, 'नदी खोऱ्यात राहणाऱ्या अंतिम उपभोगत्याला पाण्याचा फायदा होतो की नाही हे पाहणे सरकारची जबाबदारी आहे. तसे होत नसेल तर त्यासंबंधी नियोजन व व्यवस्थापन शासनाने करणे गरजेचे आहे' असे प्रतिपादन केले आहे.

दामोदर नदीचे नियंत्रण, व्यवस्थापन आणि जलविकासासाठी बिहार आणि पश्चिम बंगाल प्रांतामध्ये 'दामोदर खोरे प्राधिकरण' स्थापन करण्यासाठी जूलै १९४८ मध्ये भारतीय संसदेने दामोदर नदी आणि तिच्या उपनद्या यांचा समावेश असणारा दामोदर व्हॅली या नावाचा कायदा पास केला. संपूर्ण नदी खोरे हा विकासाचा आधार मानून जलसंपत्तीचा वापर फक्त एका उपयोगासाठी न करता सिंचन, जलवाहतूक, घरगुती व औद्योगिक वापरासाठी जलऊर्जा निर्मिती, एखाद्या राज्यापूरता किंवा प्रदेशापूरता विचार न करता संपूर्ण नदी खोऱ्याचा विकास करणे, बहुउद्देशीय प्रकल्प आणि त्याची सामाजिक, आर्थिक व पर्यावरण विकासाच्या उद्दिष्ट्यांशी सांगड घालणे यामुळे समग्र विकासाचे उद्दिष्ट्ये साध्य होणार होते.

ii. **हिराकूड बहुउद्देशीय प्रकल्प** (Hirakud Multipurpose Project) **:** छत्तीसगड राज्यात रायपूर जिल्ह्यातील डोंगर रांगात महानदीचा उगम होतो. ही नदी बंगालच्या उपसागरास मिळते. महानदीची एकूण लांबी ८५१ कि.मी. असून पाणलोट क्षेत्र १,४१,५८९ चौ.कि.मी. आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओरीसातील कटक येथे एका परिसंवादामध्ये 'ओरिसातील नद्यांचा विकास' या विषयावर विचार मांडले. त्यांच्या मते महानदी बहुउद्देशीय योजनेमुळे ओरीसातील महापूर व मलेरीया रोग या संदर्भात समस्या सोडविण्यासाठी तसेच जलवाहतूक, जलविद्युत निर्मिती व जलाशय निर्मिती हे सर्व उद्देश पूर्ण होऊ शकतील. ओरीसातील त्रिभूज प्रदेशात महापूरामुळे अनेक समस्या निर्माण होतात असे नाही, तर त्या प्रदेशात त्यांचे स्वरुप उग्र असते. ओरीसा व इतर राज्यातील नद्यांच्या समस्या निवारणार्थ अमेरिकेने राबविलेल्या धोरणाचा व तंत्राचा स्विकार केला. पाणी संसाधन बनविण्यासाठी नदी खोऱ्यात ठिकठिकाणी बांध व धरणे बांधणे आवश्यक असल्याचे बाबासाहेबांनी प्रतिपादन केले.

सन १९४५ मध्ये ओरिसातील पूर समस्यांवर उपाय शोधण्याचे काम तत्कालीन भारत सरकारने अंगिकारले. जलमार्ग, सिंचन व जलवाहतूक आयोगाचे अध्यक्ष डॉ. ए.एन. खोसला यांनी ओरिसा राज्याला भेट दिली. ओरिसा राज्याचे गव्हर्नर यांचे सल्लागार बी.के. गोखले व मुख्य अभियंता रायबहाद्दूर ब्रिज नारायण यांच्या चर्चेतून असे ठरले की ओरिसा राज्यातील पूर, दुष्काळ, गरीबी व रोगराई निर्मूलनासाठी जलाशय निर्माण करुन पूर नियंत्रण, जलसंधारण करणे गरजेचे आहे. पूर नियंत्रण करुन सिंचन, जलवाहतूक, जलविद्युत निर्मिती, मत्स्यपालन आणि मनोरंजन यासाठी पाण्याचा उपयोग करुन घेण्याचा निर्णय झाला. हिराकूड धरणाची पायाभरणी १५ मार्च १९४६ रोजी झाली. या समारंभाचे अध्यक्ष डॉ.ए.एन.खोसला होते. या कार्यक्रमास पंडीत जवाहरलाल नेहरु उपस्थित होते. धरणासंबंधी बोलताना पंडीत नेहरु म्हणाले, 'धरणे भारताची आधूनिक मंदिरे आहेत' तर डॉ. ए.एन. खोसला म्हणाले 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दामोदर, हिराकूड व सोन हे बहुउद्देशीय प्रकल्प सुरु करण्यात सिंहाचा वाटा आहे.' आधूनिक मंदिराच्या पायाभरणीचे कार्य डॉ. आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या काळात केले.

२८ ऑगस्ट १९४७ रोजी ओरीसा असेंब्लीने हिराकूड धरणाचे विधेयक मंजूर केले. १९४८ मध्ये ओरिसातील पूर समस्या सोडविण्यासाठी प्रख्यात अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या नेतृत्त्वाखाली समिती गठीत करण्यात आली. सर विश्वेश्वरय्या यांनी या संदर्भात दोन अहवाल सादर केले. याच वेळी डॉ. आंबेडकर दामोदर नदी योजना नियोजनामध्ये व्यस्त होते. त्यावेळी ओरिसातील प्रसिद्ध नेता हरीकिसन मेहता यांनी डॉ.आंबेडकरांना पत्र लिहून 'महानदी खोरे बहुउद्देशीय योजना' विकसित करण्याची इच्छा व्यक्त केली. सर विश्वेश्वरय्या यांनी हिराकूड बहुउद्देशीय प्रकल्प अमेरिकेतील टेनिसी नदी खोरे प्रकल्प व कोलंबिया नदी खोरे प्रकल्प या धरतीवर करण्याची शिफारस केली. डॉ. ए.एन. खोसला यांच्या मार्गदर्शनाखाली महानदीवर बांध निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार महानदीवर एकूण तीन बांध निर्माण करण्यात यावेत. बांध निर्मिती उद्देश फक्त महापूर नियंत्रण एवढाच नसून चिरस्थायी सिंचन सुविधा, जलवाहतूक आणि जलऊर्जा निर्मिती, समुद्र किनाऱ्यापासून ५०० कि.मी. खंडातंर्गत भागात महानदी पात्रात जलमार्गाची निर्मिती करणे, खनिज संसाधनाचा जास्तीत जास्त वापर करणे, जलव्यवस्थापन व मलेरिया नियंत्रण आणि निर्मूलन यासाठी कार्य करणे, मत्स्यपालन व मत्स्योत्पादनाची सुविधा निर्माण करणे इत्यादी मुद्यांचा समावेश करण्यात आला.

iii. **सोन नदी प्रकल्प** (Son River Project) **: सोन नदीचा उगम मध्य प्रदेशात मैकल डोंगररांगेत अमरकंटक जवळ होतो. या नदीची एकूण लांबी ७८० कि.मी. असून पाणलोट क्षेत्र १७,९०० चौ.कि.मी. आहे. सोन नदी पाटण्याजवळ गंगा नदीला मिळते. ही बहुउद्देशीय योजना सन १९४४-४५ मध्ये सुरुवात केली गेली. सोन नदी प्रकल्पाबाबत चर्चा करण्यासाठी सोन नदी प्रकल्प परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे विचार मांडले की, जर नदीचा पुरेपुर उपयोग करुन घ्यायचा असेल तर स्थानिक फायद्या ऐवजी प्रादेशिक विचार करावा. सोन नदी प्रकल्प निर्मितीचा मुख्य उद्देश मोठ्या प्रमाणात कृषी उद्योग आणि जलविद्युत निर्मिती यासाठी पाण्याचा योग्य वापर हे होते. या प्रमुख उद्देशाशिवाय ज्या भागातील जमिनीमध्ये जास्त प्रमाणात पाणी आहे. अशा दलदलयुक्त जमिनीतून पाण्याचा निचरा करणे, औद्योगिक क्षेत्रासाठी कमी दराने वीज पुरवठा करणे, पूर नियंत्रण इत्यादी बाबींचा समावेश होता. या प्रकल्पाचा फायदा उत्तरप्रदेश, बिहार आणि इतर काही राज्यांना आर्थिकदृष्ट्या कसा होईल याचा प्राधान्याने विचार केला. या प्रकल्पातील पाण्याचा उपयोग कृषी, वीज निर्मिती, घरगुती वापर, औद्योगिक विकास, शहरास पाणी पुरवठा इत्यादी संबंधीचे सविस्तर असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले.**

**६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी गौरवोद्गार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जलनितीच्या संदर्भात १९४६ मध्ये सी.एच. भाभा यांनी पुढील उद्गार काढले. आपण अत्याधुनिक अशा जल विकास संकल्पनेकडे वळलो आहोत. महानदी, सोन, कोसी नदी प्रकल्प तयार झाला. प्रादेशिक विकासाचे प्रकल्प डॉ. आंबेडकरांनी तयार केले त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

प्रा.एच.सी. हर्ट यांनी 'न्यूज इंडियाज रिव्हर्स' या पुस्तकात दामोदर प्रकल्प निर्मिती संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाबाबत पुढील उद्गार काढले. खोऱ्यात पावसाचे पाणी किती उपलब्ध होईल, त्याचे नियंत्रण कसे करावे इत्यादी प्रश्नांची सोडवणूक इंजिनिअर मंडळी करु शकली. परंतु कठीण प्रश्न मुख्यत: राजकीय स्वरुपाचे होते. रहिवाशांची इच्छा, बिहार व पश्चिम बंगाल सरकारची मान्यता, खर्चाचे विवरण या संबंधी दामोदर खोरे विकासाच्या बाबतीत राजकीय निर्णय घेतला ती व्यक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खऱ्या अर्थाने जल व ऊर्जा नियोजन याची पायाभरणी करण्याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते.

७. **निष्कर्ष** (Conclusions)**:-**

१. **बारमाही नद्या हंगामी नद्यांशी जोडण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. यामुळे महापूर ही नैसर्गिक आपत्ती न राहता जलसंपत्ती ठरेल. सिंचन सुविधा उपलब्ध होऊन शेतकरी व शेतमजूरांचा आर्थिक स्तर उंचावेल.**

२. **नदी राज्या राज्यात विभागली जाऊ नये, त्यावर केंद्रशासनाचे नियंत्रण असावे हे समान हक्क, सामाजिक न्याय व राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरेल.**

३. **डॉ. आंबेडकरांच्या मते अतिरिक्त पाणी (महापूर) हे संकट नसून नियंत्रण, नियोजन व व्यवस्थापन केल्यास ते शाश्वत विकासाचे संसाधन ठरु शकते.**

४. **महापूर प्रतिबंधक उपाय म्हणून बहुउद्देशीय योजना आखणे आवश्यक आहे. नदी खोरे प्राधिकरण, केंद्रीय जलआयोग, जलमार्ग, सिंचन व जलवाहतूक आयोग, केंद्रीय ऊर्जा प्राधिकरण यांच्या निर्मितीत डॉ.आंबेडकरांचे महत्त्वाचे योगदान राहिले.**

ब. **शिफारशी** (Recommendations)**:-**

१. **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नदी जोड प्रकल्प व बहुउद्देशीय नदीखोरे विकास प्रतिमान** (Model) **सद्यस्थितीत हिमालय पर्वतीय प्रदेशातील जलप्रणालीसाठी अंमलात आणावे.**

७. **संदर्भ** (References)**:-**


१. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ – दया पवार (निमंत्रक) – महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – २५ डिसेंबर १९९३.**

२. **भारताचा भूगोल – डॉ. शंकरराव शेटे – अभिजित पब्लिकेशन, लातूर – २००४.**

३. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान – सुखदेव थोरात (अनुवाद– प्रा.रमेश दांडगे), सुगावा प्रकाशन, पुणे – नोव्हेंबर २००५.**

४. **लोकराज्य – मनिषा पाटणकर (मुख्य संपादक) – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई – ऑक्टोंबर २००६.**

५. **लोकराज्य – चंद्रशेखर ओक (मुख्य संपादक) – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई– एप्रिल २०१५.**

६. **सकाळ दैनिक अंक– भीमा तुझ्या जन्मामुळे– रमेश पांडव – एप्रिल २०१६.**

७. **शिक्षण संक्रमण – कृष्णकुमार मा. पाटील (संपादक) – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – एप्रिल २०१७.**

8. Sunil Thakare, Jyotiram More:A Geographical Study of Shere Village In MulshiTaluka of Pune District Impact Factor 1.906MaharashtraBhugolshastraSansodhanPatrikaJul-Dec 2014, Vol XXXI, No. 2, PP, 72-79, 108 ISSN (print/online): 0971- 6785.

9. Nilesh Kale, Jyotiram More:Morphometric Analysis of Upper GhodBhima Using GIS Techniques Impact Factor 2.243 Online International Research Journal Volume-IV, Issue-V,Sep-Oct 2014, PP-152-158 ISSN-2249-9598,



*** प्रा.डॉ. सोमनाथ लांडगे**
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, ता. जि. बीड.